**झोपडी दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची संरक्षणप्राप्त असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासियाचा निवारा निश्चित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

शासन निर्णय क्रमांकः झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक :- २२ जुलै, २०१४.

### वाचा :-

१.शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्र.झोपुयो-१०९७/प्र.क्र.४५१५/झोपसु-१, दिनांक १४.०५.१९९८

२. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.गवसु/१२२०/प्र.क्र.२०४(१)/झोपसु-१, दिनांक ११.७.२००१

३. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, आदेश क्र.गवसु-१२२०/प्र.क्र.२०४(१)/ झोपसु-१, दिनांक ०८.११.२००१

४. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.गवसु/१२२०/प्र.क्र.३६४(२)/झोपसु-१, दि. ३ मे, २००३

५. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग,पर्यायी-२००६/प्र.क्र.८१/झोपनि-२, दिनांक १९.०५.२००६.

६. शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग, क्र.झोपुयो-२००७/प्र.क्र.१०५/झोपसु-१, दि. १७.०१.२००८.

७. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.झोपसु-२००८/प्र.क्र.२४७/झोपसु-१, दि.२३.१०.२००८.

८. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.झोपसु-२०१०/प्र.क्र.१/झोपसु-१, दि. २ जानेवारी, २०१२.

९. शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.झोपसु-२०१०/प्र.क्र.१(भाग-१)/झोपसु-१, दि. २९ जून, २०१२

### प्रस्तावना :-

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम, १९७१ तसेच महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा,निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम,२०११ आणि महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम, २०१४ च्या तरतूदीनुसार दि.०१.०१.२००० या अर्हता दिनांक रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनीवरील घोषित तसेच गणनाकृत झोपडीत सध्या प्रत्यक्ष रहात असलेल्या झोपडीवासियाचा निवारा संरक्षित करण्यात आला आहे. उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३Y मधील तरतुदीनुसार या कायदयाच्या प्रयोजनार्थ दि.१.१.२००० वा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या झोपडीत प्रत्यक्ष राहणाऱ्या व्यक्तीला विशिष्ठ कागदपत्रांची पडताळणी करुन ओळखपत्र (फोटोपास ) देणे आवश्यक आहे. त्याकरीता संदर्भांकित दि.११ जुलै,२००१ च्या शासन निर्णयानुसार यापूर्वी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. तद्नंतर पडताळणी करण्याकरीता विहित केलेल्या कागदपत्रांच्या/अभिलेखांच्या यादीत संदर्भाकित दि. ८ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयानुसार सुधारणा करण्यात आली आहे. तथापि उपरोक्त अधिनियमातील कलम ३Y च्या तरतुदी विचारात घेता सध्या

अस्तित्वात असलेली झोपडी दि.१.१.२००० रोजी अथवा त्यापूर्वीपासूनची असणे आवश्यक असल्याने त्याबाबतच्या तपासणीकरीता आणि त्या झोपडीत प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासियाचा निवारा निश्चित करण्याच्या कागदपत्रांच्या/अभिलेखांच्या यादीत व कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच त्या अनुषंगाने दि. १.१.२००० रोजी अस्तित्वात असलेल्या झोपडीत राहणाऱ्या संरक्षणपात्र झोपडीवासियाचे उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३Z खाली पुनर्वसन व पुन:स्थाननिश्चयन संदर्भात निदेश देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

## शासन निर्णय :-

१. शासनाने आता सर्वंकष विचार करुन या प्रयोजनार्थ सध्या अस्तित्वात असलेल्या दि.११ जुलै, २००१ दि. ८ नोव्हेंबर, २००१ आणि दि. २ जानेवारी, २०१२ च्या आदेशातील तरतुदींचे अधिक्रमण करुन खालीलप्रमाणे सुधारीत कागदपत्रे/अभिलेख व कार्यपध्दती विहित करण्याचे निर्णय घेतले आहेत.

*झोपडी व झोपडीवासिय संरक्षणपात्र ठरविण्याबाबत.*

(अ) झोपडी दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीची संरक्षणप्राप्त झोपडी आहे काय, हे ठरविण्याकरीता सोबतच्या विवरणपत्र "अ"मधील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आणि विवरणपत्र "अ" आणि विवरणपत्र "ब" या दोन्हींमधून आणखी कोणताही एक असे एकूण दोन पुरावे आवश्यक आहेत.

(ब) झोपडी दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची अस्तित्वात असल्याचे निश्चित झाल्यावर दि.१.१.२००० रोजी त्यात राहणारा झोपडीवासीय सध्या रहात असल्याबद्दल निश्चित करण्यासाठी त्याच्या नावाचा व त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या पत्त्याचा उल्लेख असलेले उपरोक्त विवरणपत्र "अ"मधील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आणि विवरणपत्र "अ" आणि विवरणपत्र "ब" या दोन्हींमधून आणखी कोणताही एक असे अलिकडच्या एक वर्षातील एकूण दोन पुरावे आवश्यक आहेत.

(क) झोपडी दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची अस्तित्वात असल्याचे निश्चित झाल्यावर त्या झोपडीत दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासून रहात असल्याचे पुरावे नसलेल्या अथवा अशा संरक्षणपात्र झोपडीत दि.१.१.२००० नंतरच्या दिनांकापासून सध्या रहात असलेल्या झोपडीवासियाने स्वत:चा निवारा संरक्षित होण्याकरीता उपरोक्त विवरणपत्र "अ"मधील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आणि विवरणपत्र "अ" आणि विवरणपत्र "ब" या दोन्हींमधून आणखी कोणताही एक असे अलिकडच्या एक वर्षातील एकूण दोन पुरांवे सादर करणे आवश्यक आहेत.

*शपथपत्राबाबत*

२. झोपडीवासियाने त्याच्या नावे व त्याच्या /तिच्या पत्नीच्या/पतीच्या नांवे अथवा १८ वर्षाखालील (अज्ञान) मुलांच्या नांवे संबंधित महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद अशा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात अन्य झोपडी/घर/सदनिका मालकी तत्वावर अथवा भाडे तत्वावर नसल्याचे शपथपत्र रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर भरुन देणे आवश्यक राहील. त्यात चुकीची माहिती दिल्याचे आढळून आल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईलच, त्याशिवाय त्या व्यक्तीविरुध्द योग्य ती फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

*दि.१.१.२००० पूर्वीपासूनच्या झोपडी-वासियांसाठी अर्जाबाबत*

३. अ) झोपडी दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीची संरक्षणप्राप्त असल्याबद्दल व त्यात १.१.२००० अथवा त्यापूर्वीपासून राहणाऱ्या झोपडीवासियाने स्वत:चा निवारा संरक्षित होण्याकरीता शासनाकडून उपलब्ध करुन देण्यांत येणा-या "जोडपत्र-तीन" मध्ये दर्शविलेल्या छापील अर्जातच संबंधित पुराव्यांसह माहिती सादर करणे आवश्यक आहे. शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणारे छापील अर्ज संबंधित सक्षम प्राधिकाराच्या कार्यालयाकडून झोपडपट्टीवासियांना उपलब्ध होतील व त्यांच्याच कार्यालयात स्विकारले जातील. बृहन्मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड व नागपूर शहरातील सध्या मंजूर असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अपात्र ठरलेल्या झोपडीवासियांनी संबंधित सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडील गुलाबी रंगातील जोडपत्र- ४ मध्ये दर्शविलेला छापील अर्ज भरणे आवश्यक राहील.

*दि.१.१.२००० नंतरच्या झोपडी-वासियांसाठी अर्जाबाबत.*

ब) झोपडी दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची संरक्षणपात्र असल्याबद्दल व त्या झोपडीत दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासून रहात असल्याचे पुरावे नसलेल्या अथवा दि.१.१.२००० नंतरच्या दिनांकापासून सध्या रहात असलेल्या झोपडीवासियाने स्वत:चा निवारा संरक्षित होण्याकरीता शासनाकडून उपलब्ध करुन देण्यांत येणा-या "जोडपत्र-चार" मध्ये दर्शविलेल्या छापील अर्जातच संबंधित पुराव्यांसह माहिती सादर करणे आवश्यक आहे . शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणारे छापील अर्ज संबंधित सक्षम प्राधिकाराच्या कार्यालयाकडून झोपडीवासियांना उपलब्ध होतील व त्यांच्याच कार्यालयात स्विकारले जातील. बृहन्मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड व नागपूर शहरातील सध्या मंजूर असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अपात्र ठरलेल्या झोपडीवासियांनी संबंधित सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडील गुलाबी रंगातील जोडपत्र- ४ मध्ये दर्शविलेला छापील अर्ज भरणे आवश्यक राहील. संरक्षणपात्र झोपडीत दिनांक १.१.२००० नंतरच्या दिनांकापासून राहणारा जो झोपडीवासिय संदर्भांकित दिनांक २ जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयानुसार अर्ज केल्यावर यापूर्वी अपात्र ठरला असेल, त्यास देखील या शासन निर्णयानुसार पुन्हा "जोडपत्र-चार" मध्ये अर्ज करता येईल.

*सक्षम प्राधिकारी यांच्या कार्यपध्दती-बाबत.*

४. झोपडीवासियाकडून जोडपत्र-तीन अथवा जोडपत्र- चार प्रमाणे छापील भरलेले अर्ज , कागदपत्रे/अभिलेख व शपथपत्र प्राप्त झाल्यावर संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी त्या पुराव्यांची खालील कार्यपध्दती अनुसरुन "जोडपत्र-पाच " मध्ये नमूद केल्याप्रमाणे तपासणीअंती योग्य तो निर्णय द्यावा.

अ) बृहन्मुंबईकरीता राज्य शासनामार्फत राबविण्यात आलेल्या " झोपडपट्टीवासियांकरिता ओळखपत्र योजना-२००१ " मोहिमेतील, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संगणकावर संकलित केलेल्या माहितीच्या व फोटोच्या आधारे पडताळणी करावी.

ब) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीसाठी निष्कासित झालेल्या झोपडीच्या बाबतीत उपरोक्त विहित पुराव्यांच्या आधारे पात्रता/अपात्रता ठरविताना परिशिष्ट-॥ चा संदर्भ संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी घ्यावा.

क) झोपडीवासियाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे संबंधित सक्षम प्राधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्याने प्रचलित पध्दतीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत झोपडपट्टीचा उपग्रह नकाशा (Satellite Maps of Slums)

उपलब्ध झाल्यावर त्या नकाशात त्या झोपडीचे ठिकाण दर्शवून त्या नकाशाची प्रत त्यांच्या कार्यालयीन अभिलेखात ठेवावी.

ड) झोपडीच्या ठिकाणी सक्षम प्राधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्याने प्रत्यक्ष जाऊन स्थळ तपासणी करणे आवश्यक राहील.

इ) झोपडीवासियाकडून वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या अर्जावर सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय झाल्यावर सदरहू अर्जाचे संगणकीकरण करुन अभिलेखांचे जतन करण्यात येईल.

*भोगवटा हस्तांतरण शुल्काबाबत.*

५. झोपडीवासिय जोडपत्र-दोन नुसार संरक्षणपात्र असल्याचे आढळल्यावर तो प्रत्यक्ष भोगवटादार असल्याची नोंद सक्षम प्राधिकारी यांच्या अभिलेखात घ्यावी लागेल व त्यासाठी ' भोगवटा हस्तांतरण शुल्क ' (Occupancy Transfer Charges) जोडपत्र-दोन च्या क्र.(vi) नुसार भरावे लागेल. सदरहू आकारण्यात येणाऱ्या ' भोगवटा हस्तांतरण शुल्काची' रक्कम "(बी) कराव्यतिरिक्त महसूल, (सी) कराव्यतिरिक्त इतर महसूल- (दोन) सामाजिक सेवा, ०२१६- गृहनिर्माण, ०२, नागरी गृहनिर्माण, ८००, इतर रकमा (०१) (०१) गलिच्छ वस्तीत राहणाऱ्यांकडून अनुज्ञप्ती शुल्क/भरपाई वगैरे (०२१६००२२)" या जमा लेखाशिर्षा खाली जमा करण्यात येईल.

*मंजूर झोपडपट्टी पुनर्वसन योजनांबाबत*

६. महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम १९७१ मध्ये झोपडी संरक्षणासाठी विहित केलेला दि.०१/०१/१९९५ हा दिनांक २ मे, २०१४ च्या राजपत्रात प्रसिध्द झाल्याप्रमाणे त्या दिनांकापासून दि. ०१/०१/२००० असा झालेला आहे. त्यामुळे दि. २ मे, २०१४ पूर्वी मंजूर झालेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत संबंधित झोपडीवासियांच्या सहकारी संस्थेला अथवा विकासकाला आशयपत्र देण्यात आले असल्यास व पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम चालू असलेल्या अशा झोपडपट्टीतील दि.१.१.१९९५ व दि. १.१.२००० दरम्यानची झोपडी अपात्र ठरलेली असल्यास अथवा झोपडीत राहणारी व्यक्ती बदलल्याच्या कारणास्तव संबंधित झोपडीवासिय यापूर्वी अपात्र ठरलेला असल्यास, अशा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंमलबजावणीमुळे अशी झोपडी निष्कासित करण्यात आली असली तरी अथवा झोपडीवासियाने स्वत:हून निष्कासन केलेले असल्यास व असा झोपडीधारक नविन निकषाअन्वये पात्र ठरल्यास अशा झोपडीवासियाचे तेथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या पुनर्वसन घटकातील बांधकाम चालू असलेल्या इमारतींमध्ये पुनर्वसन करण्याची बाब प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीच्या अधिनस्त राहील. तथापि संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या सर्व पुनर्वसन इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असल्यास यापूर्वीच्या दि.१.१.१९९५ च्या निकषानुसार अपात्र ठरलेल्या झोपडीवासियास तेथील पुनर्वसन इमारतीत सामावून घेणे शक्य होणार नाही.

*प्रकल्पग्रस्त झोपडीवासियां -बाबत.*

७. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, विविध महानगरपालिका व नगरपालिकांकडून राबविण्यात येणाऱ्या नागरी सुविधा अथवा पायाभूत प्रकल्पांतर्गत बाधित होणाऱ्या संरक्षित झोपडपट्टीवासियांकरीता देखिल या आदेशातील तरतुदी लागू राहतील.

८.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०७२२१४१९०५८६०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Debashish Chakrabarty

Digitally signed by Debashish Chakrabarty
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Debashish Chakrabarty
Date: 2014.07.22 15:14:31 +05'30'

( देबाशिष चक्रबर्ती )

प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव व सचिव
३. मा.सभापती, विधान परिषद/मा.अध्यक्ष, विधानसभा
४. मा.विरोधी पक्षनेता विधान परिषद/मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
५. मा.सर्व विधानसभा आणि विधान परिषद सदस्य
६. मा.मुख्य सचिवांचे सह सचिव
७. मा.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
८. मा.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
९. मा.महाअभिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय,
१०. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव ,
११. मा. सर्व महानगरपालिका आयुक्त,
१२. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर व प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई
१३. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व),मुंबई-५१
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई/पुणे-चिंचवड क्षेत्र/नागपूर
१५. विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्वकिास प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१
१६. सर्व विभागीय महसूल आयुक्त,
१७. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
१८. जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगरे जिल्हा
१९. अपर जिल्हाधिकारी(अति/निष्का) मुंबई शहर/पश्चिम उपनगर/पूर्व उपनगरे

२०. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१

२१. गृहनिर्माण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी

२२. निवड नस्ती (झोपसु-१), गृहनिर्माण विभाग.

# विवरणपत्रे

(शासन निर्णय, क्रमांक-झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१ दि. २२ जुलै, २०१४)

## विवरणपत्र " अ "

दि.१.१.२००० रोजीच्या अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता) उल्लेख असलेले—

-१) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन २००० यावर्षी अथवा त्यापूर्वीच्या वर्षाच्या प्रकाशित झालेल्या अंतीम मतदार यादीचा प्रमाणित उतारा.

अथवा

-२ त्या झोपडीत प्राधिकृत वीज कंपनीने वीज जोडणी दिल्याची कागदपत्रे/ अभिलेख /देयक

अथवा

-३) राज्य शासनामार्फत संदर्भांकित दि.११ जुलै,२००१ च्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या "पात्र झोपडपट्टीवासियांकरिता ओळखपत्र योजना-२००१ नुसार देण्यात आलेले गणना फॉर्म

अथवा

-४) झोपडीची महानगरपालिका/ नगरपरिषदेने मालमत्ता कर आकारणी केल्याचा पुरावा.

अथवा

-५) राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून अकृषिक परवानगी अथवा अकृषिक वापर नियमित करण्याची परवानगी व त्यावेळी भरलेल्या अकृषिक कर/अकृषिक दंडाच्या रक्कमेची पावती.

अथवा

-६) दि.१.१.२००० किंवा त्यापूर्वी नोंदणीकृत असलेल्या झोपडपट्टी सह.गृहनिर्माण संस्थेचे सहाय्यक निबंधक, सहकार यांनी प्रमाणित केलेले भाग प्रमाणपत्र.

## विवरणपत्र " ब"

दि.१.१.२००० रोजीच्या अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता) उल्लेख असलेले--

--१) महानगरपालिका व नगरपालिकेकडून देण्यात आलेले झोपडीवासियाचे अथवा त्याची पत्नी/पती अथवा अपत्याचे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र.

अथवा

--२) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त करण्यात आलेल्या डोमिसाईल(वास्तव्याचा पुरावा) सर्टिफिकेट.

अथवा

--३) मुंबई महानगर /भारत दूरसंचार निगम कंपनीकडून दुरध्वनी जोडणी दिल्याची कागदपत्रे/ अभिलेख /देयक.

अथवा

--४) झोपडीवासियाचे नाव, वय इ. बदलण्याबाबते शासन राजपत्र.

अथवा

--५) झोपडीला महानगरपालिका/नगरपालिकेकडून जलजोडणी दिल्याचा पुरावे / देयक.

अथवा

--६) झोपडपट्टीवासियाने स्वत:च्या नावे प्राप्त केलेले पारपत्र.

अथवा

--७) केंद्र व राज्य शासनाच्या (उदा. संजय गांधी निराधार योजना/वृध्दापकाळ पेन्शन इत्यादि) योजनांतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्याबाबतची कागदपत्रे/ अभिलेख.

अथवा

--८) झोपडपट्टीवासियास न्यायालयाकडून प्राप्त झालेले समन्स.

अथवा

--९) आयकर विभाग अथवा महानगरपालिका/नगरपालिका अथवा शासकीय/निमशासकीय कार्यालयात कराचा भरणा केल्याचा पुरावा.

अथवा

--१०) राष्ट्रीयकृत, खाजगी अथवा सहकारी बँकेत झोपडीवासियाच्या अथवा त्याची पत्नी/पती अथवा अपत्याचे उघडलेल्या खात्याचे पासबुक.

अथवा

--११) महानगरपालिका/नगरपालिका, शासकीय व अनुदानित शाळा /महाविद्यालय सोडल्याच्या दाखला.

अथवा

--१२) त्या विशिष्ट झोपडीत अधिकृत गॅस कंपनीकडून गॅस पुरवठा करण्यात येत असल्याचा पुरावा.

अथवा

--१३) प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिलेला वाहन चालविण्याचा परवाना.

अथवा

--१४) केंद्र शासनाकडुन देण्यात आलेले युआयडी "आधार कार्ड"

--१५) व्यावसायिक अथवा औद्योगिक स्वरुपाच्या वापरात असलेल्या अथवा त्यांसह निवासी वापरात असलेल्या झोपडीच्या बाबतीत त्या झोपडीच्या क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा निश्चित ठिकाण दर्शविणारा महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषदेचा दि.१/१/२००० अथवा त्यापूर्वी प्राप्त झालेला (अ) गुमास्ता परवाना/ खाणावळ किंवा (ब) उपहारगृह लायसन्स/त्या अनुषंगाने भरण्यात आलेल्या कराची पावती अथवा (क) विक्रीकर /व्यवसाय कर भरल्याची पावती अथवा (ड) आयकर, सेवाकर अथवा इतर कर भरल्याचा पुरावा. (इ) राज्य शासनाच्या वजने व मापे कार्यालयाची प्रमाणपत्रे

# जोडपत्र -एक

(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, दिनांक २२ जुलै, २०१४)

दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनच्या संरक्षणपात्र झोपडीत त्या दिनांकास राहणारा झोपडीवासिय सध्या त्यात रहात असल्याबद्दल निश्चित करण्यासाठी त्याने पुढील कागदपत्रे /अभिलेख सादर करणे आवश्यक आहे.

---

(१) झोपडी संरक्षणपात्र ठरण्याकरीता दि.१.१.२००० रोजी अथवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असल्याबद्दलचे पुरावे आवश्यक असल्यामुळे सोबतच्या विवरणपत्र "अ"मधील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आणि विवरणपत्र "अ" आणि विवरणपत्र "ब" या दोन्हींमधून आणखी कोणताही एक असे एकूण दोन पुरावे आवश्यक आहेत.

आणि

(२) दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल आणि झोपडीवासिय दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासून सध्या त्यात प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा पुरावा म्हणून त्याचे नांव व झोपडीचा पत्ता अथवा त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारे सोबतच्या विवरणपत्र "अ"मधील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आणि विवरणपत्र "अ" आणि विवरणपत्र "ब" या दोन्हींमधून आणखी कोणताही एक असे एकूण दोन पुरावे आवश्यक आहेत.

आणि

(३) शासन आदेशातील परिच्छेद क्र.२ नुसार शपथपत्र.

# जोडपत्र- दोन

(शासन निर्णय, क्रमांक झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, दिनांक २२ जुलै, २०१४)

दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनच्या संरक्षणपात्र झोपडीत सध्या रहात असलेल्या झोपडीवासियाकडे दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासून रहात असल्याचे पुरावे नसल्यास अथवा तो दि.१.१.२००० नंतरच्या दिनांकापासून रहात असल्यास त्याने पुढील कागदपत्रे / अभिलेख सादर करणे आवश्यक आहे.

(i) झोपडी संरक्षणपात्र ठरण्याकरीता दि.१.१.२००० रोजी अथवा त्यापूर्वीपासून अस्तित्वात असल्याबद्दलचे पुरावे आवश्यक असल्यामुळे सोबतच्या विवरणपत्र "अ"मधील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आणि विवरणपत्र "अ" आणि विवरणपत्र "ब" या दोन्हींमधून आणखी कोणताही एक असे एकूण दोन पुरावे आवश्यक आहेत.

आणि

(ii) दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल आणि झोपडीवासिय सध्या त्यात प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा पुरावा म्हणून नांव व झोपडीचा पत्ता अथवा त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारे सोबतच्या विवरणपत्र "अ"मधील कोणताही किमान एक अनिवार्य पुरावा आणि विवरणपत्र "अ" आणि विवरणपत्र "ब" या दोन्हींमधून आणखी कोणताही एक असे एकूण दोन पुरावे आवश्यक आहेत.

आणि

(iii) शासन आदेशातील परिच्छेद क्रमांक "२" प्रमाणे शपथपत्र

आणि

(iv) झोपडीवासिय सध्या तेथे रहात असल्याचे अतिरिक्त पुरावे म्हणून:-

--अ) झोपडीवासियाने त्या झोपडीचा ताबा घेतल्यानंतर अलिकडच्या एक वर्षातील जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रकाशित झालेल्या अंतीम मतदार यादीचा प्रमाणित उतारा.

अथवा

--ब) त्या झोपडीवासियाने त्याच्या अपत्याच्या शासन मान्यता प्राप्त शाळेत/महाविद्यालयात नोंदविलेल्या त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारा निवासी पत्त्याबाबतचा मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेला प्रमाणित उतारा

अथवा

--क) झोपडपट्टीवासिय नोकरीस असलेल्या नियोक्त्याने त्याच्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या निवासी पत्त्याबाबत दिलेले प्रमाणपत्र.

आणि

(v) झोपडीवासीय दावा करीत असलेल्या दिनांकास त्या झोपडीचा ताबा त्याच्याकडे आल्याचा पुरावा म्हणून -

(a) अगोदरच्या झोपडीवासियाचे नोटरी केलेले मुद्रांक पेपरवरील दिनांक असलेले संमतीपत्र.

अथवा

(b) झोपडपट्टीवासिय भाडे तत्वावर रहात असल्याबद्दल भाडेकराराच्या कागदपत्रात अथवा भाडे पावतीत त्यांची नावे व त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या पत्त्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

आणि

(vi) झोपडीचा भोगवटा हस्तांरतण झाल्याची नोंद शासकीय अभिलेखात घेण्याबद्दल 'भोगवटा हस्तांतरण शुल्क ' (Occupancy Transfer Charges) म्हणून त्या झोपडीच्या बृहन्मुंबई, ठाणे, पुणे पिंपरी-चिंचवड व नागपूर येथील संरक्षणप्राप्त निवासी झोपडीकरीता रु.४०,०००/- व व्यावसायिक अथवा औद्योगिक अथवा त्यासह निवासी वापरातील झोपडीकरीता रु,६०,०००/- प्रमाणे भरणे आवश्यक राहील. अन्य शहरातील संरक्षणपात्र झोपडीकरीता 'भोगवटा हस्तांतरण शुल्क ' (Occupancy Transfer Charges) म्हणून अनुक्रमे निवासी अथवा व्यावसायिक अथवा औद्योगिक अथवा त्यासह निवासी वापराच्या शुल्काच्या ५० टक्के इतके आकारण्यात येईल.

(ऄ) झोपडीधारक मृत्यु पावलेला असल्यास त्याची पत्नी/तिचा पती यांच्या नांवे हस्तांतरित करण्यास तसेच ते दोन्ही मृत्यु पावलेले असल्यास त्यांचा मुलगा/मुलगी यांच्या नांवे ती झोपडी हस्तांतरीत करण्याकरिता ' भोगवटा हस्तांतरण शुल्क' आकारण्यांत येणार नाही.

(बी) झोपडीधारकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा लाभ मिळाल्यावर, अशा व्यक्तीला किंवा त्याच्या/तिच्या पत्नीला/पतीला अथवा त्यांच्या अज्ञान मुलांना झोपडी विकत अथवा हस्तांतरीत करुन घेता येणार नाही.

(सी ) झोपडीचे परस्पर सहमतीने विक्री अथवा विविध टप्प्यातील साखळी द्वारे हस्तांतरण झाले असल्यास सध्या वास्तव्य करणाऱ्या रहिवासीकडून 'भोगवटा हस्तांतरण शुल्क' आकारण्यात येईल. पूर्वीच्या विक्रीबाबत अथवा प्रत्येक टप्प्याचे "भोगवटा हस्तांतरण शुल्क" न आकारता केवळ सध्याच्या टप्प्यावरील 'भोगवटा हस्तांतरण शुल्क ' आकारण्यात येईल. तसेच यापुढील प्रत्येक हस्तांतरणाबाबत ' भोगवटा हस्तांतरण शुल्क ' आकारण्यात येईल.

# जोडपत्र- तीन

(शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, दिनांक २२ जुलै, २०१४ मधील जोडपत्र-एक नुसार)

## दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनच्या संरक्षणपात्र झोपडीत दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासून राहणाऱ्या झोपडीवासियासाठी अर्ज.

नगरपालिका / महानगरपालिकेचे संक्षिप्त नांव :- ☐☐☐☐ अर्ज क्र ☐☐☐☐☐☐☐

दिनांकः- / /२०.......

---

a. झोपडीवासियाचे नाव :- श्री/श्रीमती. ------------------------------------------------------------------------------------

b. झोपडीपट्टीचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

c. शहराचे नांव :- ------------------------------------ d. महापालिका/नगरपालिका/वॉर्ड क्र.----------

e. झोपडीवासीय सध्याच्या झोपडीत केव्हापासून रहात ☐☐☐☐☐☐☐☐ आहे:-

f. कुटुंबातील सदस्यांची नावे :- १.पत्नी/पती श्रीमती/श्री.--------------------------------------------

पत्नी/पतीसह फोटो

२. ------------------------------------------------------------------

३. ------------------------------------------------------------------

४. ------------------------------------------------------------------

५. ------------------------------------------------------------------

g विवरणपत्र “अ” व “ब” अन्वये-- झोपडी दि.१.१.२००० रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असल्याबद्दल सादर केलेले पुरावे :-

(अ) विवरणपत्र "अ" मधील सादर केलेला अनिवार्य पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

आणि (अतिरिक्त पुरावे असल्यास)

ब) विवरणपत्र "ब" मधील सादर केलेला पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

(अतिरिक्त पुरावे असल्यास)

आणि

h (ii) विवरणपत्र "अ" व " ब " अन्वये झोपडीवासिय सध्या त्या झोपडीत प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा अलीकडच्या एका वर्षातील पुरावा.

(अ) विवरणपत्र "अ" मधील सादर केलेल्या अनिवार्य पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

आणि (अतिरिक्त पुरावे असल्यास)

(ब) विवरणपत्र "ब" मधील सादर केलेल्या पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

(अतिरिक्त पुरावे असल्यास)

आणि

i शासन आदेशातील परिच्छेद क्रमांक २ नुसार शपथपत्र :- आहे नाही

**झोपडीवासीयाची सही/ अंगठा निशाणी :-**

**टीप :- सक्षम प्राधिकारी कार्यालयाने छायांकित प्रतीवर अर्ज प्राप्त झाल्याची पोच द्यावी.**

## झोपडीधारकांच्या मार्गदर्शनाकरिता जोडपत्र-एकच्या विवरणपत्र अ मधील ६ व ब मधील १५ पुराव्यांची यादी खालीलप्रमाणे आहे:-

| विवरणपत्र "अ" |
| --- |
| दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता)उल्लेख असलेले--<br>-१) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन २००० यावर्षी अथवा त्यापूर्वीच्या वर्षाच्या प्रकाशित झालेल्या अंतिम मतदार यादीचा प्रमाणित उतारा<br>-२) त्या झोपडीत प्राधिकृत वीज कंपनीने वीज जोडणी दिल्याची कागदपत्रे/ अभिलेख /देयक.<br>-३) राज्य शासनामार्फत संदर्भांकित दि.११ जुलै,२००१ च्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या "पात्र झोपडपट्टीवासियाकरिता ओळखपत्र योजना-२००१ नुसार देण्यात आलेले गणना फॉर्म.<br>-४) झोपडीची महानगरपालिका/ नगरपरिषदेने मालमत्ता कर आकारणी केल्याचा पुरावा.<br>-५) राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून अकृषिक परवानगी अथवा अकृषिक वापर नियमित करण्याची परवानगी व त्यावेळी भरलेल्या अकृषिक कर/अकृषिक दंडाच्या रक्कमेची पावती.<br>-६) दि.१.१.२००० किंवा त्यापूर्वी नोंदणीकृत असलेल्या झोपडपट्टी सह.गृहनिर्माण संस्थेचे सहाय्यक निबंधक, सहकार यांनी प्रमाणित केलेले भाग प्रमाणपत्र. |
| विवरणपत्र "ब" |

दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता )उल्लेख असलेले---

--१) महानगरपालिका व नगरपालिकेकडून देण्यात आलेले झोपडीवासियाचे अथवा त्याची पत्नी/पती अथवा अपत्याचे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र.

--२) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त करण्यात आलेल्या डोमिसाईल(वास्तव्याचा पुरावा) सर्टिफिकेट.

--३) मुंबई महानगर /भारत दूरसंचार निगम कंपनीकडून दुरध्वनी जोडणी दिल्याची कागदपत्रे/ अभिलेख /देयक.

--४) झोपडीवासियाचे नाव, वय इ. बदलण्याबाबते शासन राजपत्र.

--५) झोपडीला महानगरपालिका/नगरपालिकेकडून जलजोडणी दिल्याचा पुरावे / देयक.

--६) झोपडपट्टीवासियाने स्वत:च्या नावे प्राप्त केलेले पारपत्र.

--७) केंद्र व राज्य शासनाच्या (उदा. संजय गांधी निराधार योजना/वृध्दापकाळ पेन्शन इत्यादि) योजनांतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्याबाबतची कागदपत्रे/ अभिलेख.

--८) झोपडपट्टीवासियास न्यायालयाकडून प्राप्त झालेले समन्स.

--९) आयकर विभाग अथवा महानगरपालिका/नगरपालिका अथवा शासकीय/निमशासकीय कार्यालयात कराचा भरणा केल्याचा पुरावा.

--१०) राष्ट्रीयकृत, खाजगी अथवा सहकारी बँकेत झोपडीवासियाच्या अथवा त्याची पत्नी/पती अथवा अपत्याचे उघडलेल्या खात्याचे पासबुक.

--११) महानगरपालिका/नगरपालिका, शासकीय व अनुदानित शाळा /महाविद्यालय सोडल्याच्या दाखला.

--१२) त्या विशिष्ट झोपडीत अधिकृत गॅस कंपनीकडून गॅस पुरवठा करण्यात येत असल्याचा पुरावा.

--१३) प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिलेला वाहन चालविण्याचा परवाना.

--१४) केंद्र शासनाकडून देण्यात आलेले युआयडी “आधार कार्ड”

--१५) व्यावसायिक अथवा औद्योगिक स्वरुपाच्या वापरात असलेल्या अथवा त्यांसह निवासी वापरात असलेल्या झोपडीच्या बाबतीत त्या झोपडीच्या क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा निश्चित ठिकाण दर्शविणारा महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपरिषदेचा प्राप्त झालेला (अ) गुमास्ता परवाना/ खाणावळ किंवा (ब) उपहारगृह लायसन्स/त्या अनुषंगाने भरण्यात आलेल्याकराची पावती अथवा (क) विक्रीकर /व्यवसाय कर भरल्याची पावती अथवा (ड) आयकर, सेवाकर अथवा इतर कर भरल्याचा पुरावा. (इ) राज्य शासनाच्या वजने व मापे कार्यालयाची प्रमाणपत्रे

# जोडपत्र-चार

(शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्र.झोपुधो १००१/प्र.क्र.१२५/१४,झोपसु-१, दि. २२ जुलै, २०१४ मधील जोडपत्र-दोन नुसार)

## दि.१.१.२००० वा त्यापूर्वीच्या संरक्षणपात्र झोपडीत दि. १.१.२००० नंतरच्या दिनांकापासून सध्या रहात असल्यास करावयाचा अर्ज.

नगरपालिका / महानगरपालिकेचे संक्षिप्त नांव :- | | | | |   अर्ज क्र. | | | | | | |

दिनांक:- / /२०.......

---

a. झोपडीवासियाचे नाव:- श्री/श्रीमती. :-------------------------------------------------------------------------------------

b. झोपडपट्टीचे नाव व पत्ता :- ----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

c. शहराचे नांव :- ------------------------------------------------   d. महापालिका/नगरपालिका/वॉर्ड क्र.-------

e. झोपडीवासीय सध्याच्या झोपडीत केव्हापासून रहात आहे:- | | | | | | | | |

f. कुटुंबातील सदस्यांची नावे :-   १. पत्नी/पती श्रीमती/श्री.---------------------------------------------

पत्नी/पतीसह फोटो

२. ---------------------------------------------------------------

३. ---------------------------------------------------------------

४. ---------------------------------------------------------------

५. ---------------------------------------------------------------

g विवरणपत्र “अ” व “ ब ” अन्वये-- झोपडी दि.१.१.२००० रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असल्याबद्दल सादर केलेले पुरावे :-

(अ) विवरणपत्र "अ" मधील सादर केलेला अनिवार्य पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

आणि (अतिरिक्त पुरावे असल्यास)

ब) विवरणपत्र "ब" मधील सादर केलेला पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

(अतिरिक्त पुरावे असल्यास)

**आणि**

h (ii) दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्वात असल्याबद्दल आणि झोपडीवासिय सध्या त्यात प्रत्यक्ष रहात असल्याबद्दलचा विवरणपत्र “अ” व “ ब ” अन्वये सादर केलेला अलीकडच्या एक वर्षातील पुरावा :-

(अ) विवरणपत्र “अ” मधील सादर केलेल्या अनिवार्य पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

आणि (अतिरिक्त पुरावे असल्यास)

(ब) विवरणपत्र “ब” मधील सादर केलेला पुरावा/पुराव्यांचे अनुक्रमांक:- ☐ ☐ ☐ ☐ ☐

आणि (अतिरिक्त पुरावे असल्यास)

--अ) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अलीकडच्या एक वर्षातील अंतिम करण्यात आलेल्या मतदार यादीत त्याचे नांव असल्याचा प्रमाणित उतारा — आहे/नाही

अथवा

--ब) त्या झोपडीवासियाने त्याच्या अपत्याचा शासन मान्यता प्राप्त शाळेत/महाविद्यालयात नोंदविलेल्या त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणारा निवासी पत्त्याबाबतचा मुख्याधापक/प्रायार्च यांनी दिलेला प्रमाणित उतारा — आहे/नाही

अथवा

--क) झोपडपट्टीवासिय नोकरीस असलेल्या नियोक्त्याने त्याच्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविणाऱ्या निवासी पत्त्याबाबत दिलेले प्रमाणपत्र. — आहे/नाही

आणि

--ड) सक्षम प्राधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्याचा झोपडीच्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन केलेला त्याच्या पत्त्याबाबतचा तपासणी अहवाल. — आहे/नाही

आणि

| | |
|---|---|
| i शासन आदेशातील परिच्छेद क्रमांक २ नुसार **शपथपत्र** (त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात स्वत:च्या व पत्नी/पती व अज्ञान मुलाच्या नांवे अन्य झोपडी/घर/ सदनिका मालकी /भाडे/अथवा भाडे तत्वावर नसल्याचे ) :- | आहे / नाही |

टीप :- सक्षम प्राधिकारी कार्यालयाने छायांकित प्रतीवर अर्ज प्राप्त झाल्याची पोच द्यावी.

झोपडीवासीयाची सही/ अंगठा निशाणी :-

## झोपडीधारकांच्या मार्गदर्शनाकरिता जोडपत्र-एकच्या विवरणपत्र "अ" मधील ६ व "ब" मधील १५ पुराव्यांची यादी खालीलप्रमाणे आहे:-

### विवरणपत्र “अ”

दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता)उल्लेख असलेले--

-१) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन २००० यावर्षी अथवा त्यापूर्वीच्या वर्षाच्या प्रकाशित झालेल्या अंतिम मतदार यादीचा प्रमाणित उतारा

-२) त्या झोपडीत प्राधिकृत वीज कंपनीने वीज जोडणी दिल्याची कागदपत्रे/ अभिलेख /देयक.

--३) राज्य शासनामार्फत संदर्भांकित दि.११ जुलै,२००१ च्या आदेशानुसार राबविण्यात आलेल्या “पात्र झोपडपट्टीवासियाकरिता ओळखपत्र योजना-२००१ नुसार देण्यात आलेले गणना फॉर्म.

-४) झोपडीची महानगरपालिका/ नगरपरिषदेने मालमत्ता कर आकारणी केल्याचा पुरावा.

-५) राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून अकृषिक परवानगी अथवा अकृषिक वापर नियमित करण्याची परवानगी व त्यावेळी भरलेल्या अकृषिक कर/अकृषिक दंडाच्या रक्कमेची पावती.

-६) दि.१.१.२००० किंवा त्यापूर्वी नोंदणीकृत असलेल्या झोपडपट्टी सह.गृहनिर्माण संस्थेचे सहाय्यक निबंधक, सहकार यांनी प्रमाणित केलेले भाग प्रमाणपत्र.

# विवरणपत्र “ब”

दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीच्या पुराव्यात झोपडीवासियाच्या नांवासह झोपडी क्रमांकाचा उल्लेख असलेले अथवा झोपडीच्या निश्चित ठिकाणाचा (उदा. चाळ, रस्ता इत्यादि निवासी पत्ता )उल्लेख असलेले---

--१) महानगरपालिका व नगरपालिकेकडून देण्यात आलेले झोपडीवासियाचे अथवा त्याची पत्नी/पती अथवा अपत्याचे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र.

--२) जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त करण्यात आलेल्या डोमिसाईल(वास्तव्याचा पुरावा) सर्टिफिकेट.

--३) मुंबई महानगर /भारत दूरसंचार निगम कंपनीकडून दुरध्वनी जोडणी दिल्याची कागदपत्रे/ अभिलेख /देयक.

--४) झोपडीवासियाचे नाव, वय इ. बदलण्याबाबते शासन राजपत्र.

--५) झोपडीला महानगरपालिका/नगरपालिकेकडून जलजोडणी दिल्याचा पुरावे / देयक.

--६) झोपडपट्टीवासियाने स्वत:च्या नावे प्राप्त केलेले पारपत्र.

--७) केंद्र व राज्य शासनाच्या (उदा. संजय गांधी निराधार योजना/वृध्दापकाळ पेन्शन इत्यादि) योजनांतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्याबाबतची कागदपत्रे/ अभिलेख.

--८) झोपडपट्टीवासियास न्यायालयाकडून प्राप्त झालेले समन्स.

--९) आयकर विभाग अथवा महानगरपालिका/नगरपालिका अथवा शासकीय/निमशासकीय कार्यालयात कराचा भरणा केल्याचा पुरावा.

--१०) राष्ट्रीयकृत, खाजगी अथवा सहकारी बँकेत झोपडीवासियाच्या अथवा त्याची पत्नी/पती अथवा अपत्याचे उघडलेल्या खात्याचे पासबुक.

--११) महानगरपालिका/नगरपालिका, शासकीय व अनुदानित शाळा /महाविद्यालय सोडल्याच्या दाखला.

--१२) त्या विशिष्ट झोपडीत अधिकृत गॅस कंपनीकडून गॅस पुरवठा करण्यात येत असल्याचा पुरावा.

--१३) प्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिलेला वाहन चालविण्याचा परवाना.

--१४) केंद्र शासनाकडून देण्यात आलेले युआयडी “आधार कार्ड”

--१५) व्यावसायिक अथवा औद्योगिक स्वरुपाच्या वापरात असलेल्या अथवा त्यांसह निवासी वापरात असलेल्या झोपडीच्या बाबतीत त्या झोपडीच्या क्रमांकाचा उल्लेख असलेला अथवा निश्चित ठिकाण दर्शविणारा महानगरपालिका / नगरपालिका/ नगरपरिषदेचा प्राप्त झालेला (अ) गुमास्ता परवाना/ खाणावळ किंवा (ब) उपहारगृह लायसन्स/त्या अनुषंगाने भरण्यात आलेल्याकराची पावती अथवा (क) विक्रीकर /व्यवसाय कर भरल्याची पावती अथवा (ड) आयकर, सेवाकर अथवा इतर कर भरल्याचा पुरावा. (इ) राज्य शासनाच्या वजने व मापे कार्यालयाची प्रमाणपत्रे

# जोडपत्र-पाच

| सक्षम प्राधिकारी / सहाय्यक आयुक्त यांच्या कार्यालयीन उपयोगाकरीता |
|---|

सक्षम प्राधिकारी कार्यालयाचे नांव :-

दिनांक :-      /      / २०१----

-----------------------------------------------------------------------------------------------

**नगरपालिका / महानगरपालिकेचे संक्षिप्त नांव :-** [ | | | ]      **अर्ज क्र.** [ | | | | | | | ]

A. झोपडीवासियाचे नाव:- श्री/श्रीमती. ------------------------------------------------------------------------------

B. झोपडपट्टीचे नाव व पत्ता :- ---------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

A. नगर भूमापन क्रमांक :- ------------------------------------------------- महापालिका/नगरपालिका/वॉर्ड क्र. ------------

B. मौजे / तालुका / जिल्ह्याचे नांव :- --------------------------------------------- पिनकोड :-------------

C. दिनांक १.१.२००० रोजीच्या अथवा त्या पुढील दिनांक १.१.२०....... मतदार यादीत उल्लेख असल्यास :-

| महाराष्ट्र विधानसभा निर्वाचन क्षेत्र क्रमांक | मतदान केंद्र / यादीचा भाग क्रमांक | मतदार यादीतील क्रमांक |
|---|---|---|
| | | |

D. झोपडपट्टी जमीनीची मालकी :- (योग्य असेल त्या रकान्यात √ चिन्हांकित करावे)

| राज्य शासन | म्हाडा | नगरपालिका / महानगरपालिका | इतर राज्य शासकीय मंडळ / महामंडळ / प्राधिकरण इत्यादी. | केंद्र शासन / केंद्र शासन उपक्रम | खाजगी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

E.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दि. ११ जुलै २००१ अन्वये बृहन्मुंबईतील “ पात्र झोपडपट्टीवासियाकरीता ओळखपत्र योजना-२००१ ” नुसार शासकीय अभिलेखातील अर्जाची फोटो प्रत | आहे | नाही |
| २ | झोपडी दि. १.१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची असल्याचे तसेच झोपडीवासिय देखिल दि. १.१.२००० अथवा पूर्वीपासूनचा / दिनांक १.१.२००० नंतर वास्तव्यास आल्याबाबत सादर करण्यात आलेल्या पुराव्यांची पडताळणी केली असता—<br>अ) ते सर्व पुरावे योग्य आहेत. | | |

| | |
|---|---|
| | ब) त्यातील क्र. येथील पुरावे योग्य/खरे नाहीत. |
| ३ | संबंधित झोपडपट्टीच्या उपग्रह नकाशात त्या झोपडीचे निश्चित ठिकाण दर्शविण्यात आले आहे काय? [ आहे ] [ नाही ] |
| ४ | झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरु असल्यास परिशिष्ट-२ मधील अर्जदाराचे नांव व यादीतील क्रमांक :- [ \| \| \| \| \| \| \| ] |
| ५ | झोपडीच्या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन स्थळ तपासणीचा दिनांक व अभिप्राय :- [ \| \| \| \| \| \| \| ] [ अनुकुल ] [ प्रतिकुल ] |

**पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे**
**नांव, पदनाम व सही**
**दिनांक :-**

## सक्षम प्राधिकाऱ्याचा “पात्र/ अपात्र” बाबतचा निर्णय

श्री/श्रीमती ----------------------------------------------------------------------------------------

झोपडपट्टीचे नाव व पत्ता :- ----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

नगरपालिका / महानगरपालिकेचे संक्षिप्त [ \| \| \| ] अर्ज क्र. [ \| \| \| \| \| \| \| ] नांव :-

दिनांक:- / /२०१----- अन्वये झोपडीवासिय यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यावर सदरहू झोपडीवासिय महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदीनुसार तो झोपडीवासिय पुनर्वसनासाठी **"पात्र"** असल्याचे मी प्रमाणित करतो. / तो झोपडीवासिय पुनर्वसनासाठी **"अपात्र"** असल्याचे मी प्रमाणित करतो.

सक्षम प्राधिकारी
यांचे नांव, सही व
दिनांक :

Seal

.................................................................................................................................

झोपडीवासिय संरक्षणपात्र झोपडीत दि. १.१.२००० नंतरच्या दिनांकापासून रहात असल्यास शासन आदेशाच्या

परिच्छेद ५ नुसार झोपडीवासियाने भोगवटा हस्तांतरण शुल्क रक्कम भरली आहे काय ? आहे / नाही

भरली असल्यास रक्कम रुपये

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

रक्कम भरल्याचा दिनांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २ | ० | १ | |

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

छाननी अर्ज व माहितीचे संगणकीकरण करण्यांत आल्याचा दिनांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

( )

संगणकीकरण केलेल्या कर्मचा-याचे नांव व सही